# जागतिकीकरणाचा मराठी साहित्यावर पडलेला प्रभाव

कांबळे मारोती मरीबा
चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
खांदा कॉलनी, नवीन पनवेल.
ता. पनवेल जि. रायगड

**प्रास्ताविक**

जागतिकीकरण हा समकालीन काळात नित्याचा शब्द झालेला आहे. त्यामुळे एकूणच मानवी जीवनात मुलगामी बदल घडवून आणू पाहत आहे. तंत्रज्ञान आणि विविध साधन संपत्तीमुळे विश्वातलं अंतर नष्ट होऊन सरहद्दी पुसल्या गेलेल्या आहेत आणि अवकाशही संपुष्टात आलेला आहे. असेही सांगितले जात आहे. जागतिकीकरण ही संकल्पना आपणास फार जुनी नाही प्राचीन काळातही 'हे विश्वची माझे घर' याची अनुभूती भारतीयांनी घेतलेले आहे.

या जागतिकीकरणाचा मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रावर बरावाईट परिणाम दिसून येतो आहे, व्यापार, राजकारण, शास्त्र, दळण-वळण, सहकार, तत्त्वज्ञान, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक आणि भाषिक अशा सर्व क्षेत्रात याचा प्रभाव पडलेला आहे. नवे शोध नवी क्षेत्र नव्या परिभाषा जवळ येणारे जग या संकल्पनेमुळे भाषेमध्ये नवनवीन शब्दांची भर पडत आहे.

आपला देश जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये नव्वदच्या दशकात सहभागी झाला. पण या प्रक्रियेत आपल्या देशाने आनंदाने नक्कीच सहभागीत्व पत्करले नाही. तत्पूर्वीची आपल्या देशाची आर्थिक परिस्थितीही चिंताजनकच होती. हेही नाकारता येत नाही. नाईलाजास्तव का होईना आपल्या देशाला या प्रक्रियेत सहभागी व्हावे लागले. जागतिकीकरणाची प्रक्रिया जेव्हा सुरू झाली तेव्हा तिचे समर्थन करणारा विचारवंत वर्गही या देशात निर्माण झालेला दिसून येतो. हाच विचारवंतांचा वर्ग या नव्या आर्थिक व्यवस्थेतून निर्माण झालेला नवसाम्राज्यवादाचा पुरस्कारही त्यांनीच केला आणि हाकाटी पिटायलाही याच वर्गाने सुरुवात केली. जागतिकीकरणाची प्रक्रिया एकदा स्थिरावल्यावर आशावादही व्यक्त करणारा हाच वर्ग होता. या पृथ्वीतलावरील मनुष्य प्राण्याला अन्न, वस्त्र आणि निवारा या गरजा जागतिकीकरणामुळे सहज पूर्ण करता येतील. सर्वांना शिक्षणाचा आणि नोकरीचा अधिकार प्राप्त होईल आणि तो अमलात आणता येईल अशा विचारांचे विचारमंथन सुरू झाले. सकल जणांना स्वच्छ हवा, स्वच्छ प्रकाश आणि विश्व संचारही करता येईल. यामुळे दारिद्य्र निर्मूलनाच्या प्रक्रियेला गती येईल. ग्राहक राजा होऊन प्रत्येक माणसाकडे वस्तू येतील सर्वांनाच स्वतःच्या मनाप्रमाणे स्वतःचा विकास करण्याचे स्वातंत्र्य प्राप्त होईल. असा आशावाद नव साम्राज्यवादातून जगभर पसरविला जात होता. नव्या विकासाचे स्वप्न जनमानसांच्या डोळयासमोर ठेवले जात होते. याच जागतिकीकरणाने कालांतराने माणसालाही वापराची वस्तू बनविली काही काळ वापरायची आणि नंतर फेकून

द्यायची. यांत्रिकीकरणाच्या या प्रचंड रेट्यात फेकून द्यायच्या लोकांची संख्या वाढत गेली. यांना 'नवे गुलाम' अशा प्रकारची नवी संज्ञा प्राप्त झाली, जगतिकीकरणाच्या संदर्भातील रावसाहेब कसबे यांचे विवेचन महत्त्वाचे वाटते ते असे'.

'आजचे जग अशा वळणावर उभे आहे की जिथून पुढे परस्परविरुद्ध दिशांनी दोन रस्ते आहेत. त्यापैकी एक रस्ता प्रचंड संपत्तीच्या निर्मितीचा त्यासाठी निसर्गाशी संघर्ष करून त्याला लुबाडण्याचा, अमाप सुख उपभोगण्यासाठी विधीनिषेध न बाळगता संपत्ती कमावण्याची स्पर्धा आणि वैराच्या दिशेने जाणारा असेल. दुसरा एक रस्ता कार्ल मार्क्स म्हणतो तसा अशा ठिकाणी पोहोचवणारा आहे की जिथे मानवी विकासक्रमातील सर्वात आनंददायी घटना घडेल...ती घटना म्हणजे माणूस निसर्गातील सर्व स्रोत अशा पद्धतीने एकत्र करेल की निसर्ग आणि माणूस यांच्यातील द्वंद्व पूर्णपणे संपून जाईल'.

निसर्गाला कोणतीही इजा न करता माणूस त्याच्या उत्पादक स्त्रोतांचा उपभोग घेईल... हे निश्चित घडणार आहे. याबद्दल शंका नाही परंतु ते कधी घडेल याची कालनिश्चिती करण्यातइतकी परिस्थिती पक्की झालेली नाही... हा संधी काळ आहे. जुन्या भांडवलशाहीचे युग संपत आलेले आहे परंतु खऱ्या अर्थाने जागतिकीकरणाच युग अजून सुरू व्हायचे आहे.

खरोखरच जागतिकीकरणाची प्रक्रिया या मातीत खऱ्या अर्थाने अजूनही रुजलेली नाही. आज जे काही समाज जीवनात किंवा विविध क्षेत्रात दिसते ते म्हणजे जुन्या आणि नव्या काळातील हा संधीकाळच आहे. याच जागतिकीकरणाने समतेची आश्वासन दिले होते, जगातील सर्वच महिलांचे प्रश्न सुटतील. लिंगभेद संपेल, मानवी जीवनाच्या सुरक्षिततेसाठी नाना प्रकारच्या रचना तयार केल्या. याचाच परिपाक म्हणून जगभरात एनजीओचे अक्षरशः पीक उदयाला आले. यातील बहुतेक चळवळींना आधार आहे तो भांडवलदारांचा. जागतिकीकरणातूनच निर्माण झालेली विषमता नजरेवर करण्यासाठीची या एनजीओची निर्मिती झाली हेही नाकारता येत नाही. खऱ्या अर्थाने तळागाळापर्यंत जाऊन काम करणाऱ्या अशा प्रकारच्या संस्था आणि चळवळी फार कमी आहेत.

लोकांसाठी खऱ्या अर्थाने काम करणाऱ्या एनजीओ फारच अल्प प्रमाणात आहेत. नवभांडवलदाराच्या कामाचाच एक भाग एनजीओ असाव्यात असे वाटायला लागले आहे. अगदी स्पष्टच बोलायचे झाले तर नवभांडवलदारांचा वर्ग आणि एनजीओ यांच्या संगणमतानेच जागतिक पातळीवरील कार्य चालते असे म्हटले तरी वावगे ठरू नये अशी परिस्थिती आहे. आज बहुतांश आपल्या देशात आंधळे जागतिकीकरण रुजलेले दिसून येते. आज सर्वच गोष्टींचे खाजगीकरण सुरू आहे. गरिबांच्या हक्कांचे पाणी त्यावरील त्यांचा अधिकार राहिलेला नाही निसर्गनिर्मित पाणी विकत घेण्याची वेळ आली. मुठभर चंगळवादाचे चोचले पुरविण्यासाठी बाजारपेठा निर्माण झाल्या खिशातल्या पैशावरून माणसांची उंची ठरवली जात आहे. सर्वच विकास शेअर बाजाराशी जोडला गेलेला दिसून येतो. विकासाचे प्राधान्य क्रमच बदलून टाकले. जागतिकीकरणाने स्वतःचा एक झिलकारी वर्ग तयार केलेला आहे. मध्यमवर्गांचे स्तुती करून खालच्या वर्गापासून त्याला दूर करण्याची कपटनीती जागतिकीकरणाची आहे, पूर्वी सामान्य माणसाबरोबर लढणारा त्यांना साथ देणारा मध्यमवर्ग आता स्वकेंद्री बनलेला दिसून येतो. सामाजिक परिवर्तनाच्या तो विरोधी वर्तन करताना दिसतो आहे.

अशा जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर विश्व पातळीबरोबरच आपल्या देशावरी परिणाम झाले. प्रचंड दारिद्र्य आणि पराकोटीची विषमता असलेल्या या देशात अर्थव्यवस्थेचा बारकाईने अभ्यास केला पाहिजे तद्वतच येथील चिवट जाती व्यवस्था, शिक्षणाच अल्प प्रमाण आणि कमालीच्या अंधश्रद्धा हेही आपल्या देशांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य मांडले पाहिजे त्यामुळे जागतिकीकरणाच्या स्वीकारानंतर काहीच दिवसात त्यांचे परिणाम दिसायला सुरुवात झाली. याचा पहिलाच जबरदस्त आघात शेतकऱ्यांवर झाला. नव्वदच्या दशकापासून आज तागायत शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रतिवर्षी वाढतच जाताना दिसतात. आजही देशात सर्वाधिक आत्महत्या शेतकऱ्यांच्या झालेल्या आहेत. तंत्रज्ञानाने निर्माण केलेल्या अनेक गोष्टीमुळे बेकारीत प्रचंड वाढ होताना दिसते. एकंदरीतच या जागतिकीकरणामुळे आपल्या देशाची आर्थिक परिस्थिती चिंताजनकच म्हणावी अशी आहे. जागतिकीकरणाचा जीवनाच्या सर्व क्षेत्रावर आज परिणाम दिसून येत आहे. त्यात सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि धार्मिक अशा सर्वच क्षेत्रावर जागतिकीकरणाचा प्रभाव दिसत आहे.

साहित्य आणि सर्वच कलांचा विचार करता या कला एखाद्या होकायंत्रप्रमाणे कार्य करत असतात. मानवी जीवनातील चांगल्या-वाईट परिणामांचा पहिला अविष्कार आपणास कलेमध्ये पहावयास मिळतो. कारण साहित्याचा विचार करता साहित्य हे इतर कलांच्या तुलनेत प्रत्यक्ष जीवनात त्याचा अधिकाधिक वापर असतो. जागतिकीकरणाचा सर्वाधिक परिणाम ग्रामीण भागावर आणि विशेष करून शेतीवर अधिक झालेला दिसून येतो. देशाला स्वातंत्र्य मिळूनही देशाच्या नियोजनात शेतीचा क्रम सर्वात शेवटी ठेवल्यामुळे शेती अधिकच अडचणीत आलेली दिसून येते. जागतिकीकरणाच्या स्वीकारानंतर ग्रामीण स्तरावर स्थलांतरितांचा लोंढा शेहराकडे वळू लागला आहे. शहरात येऊनही त्यांच्या वाट्याला चांगले जीवन होते असेही म्हणता येत नाही. परंतु या जागतिकीकरणामुळे शहरातही बेकारीचे प्रमाण वाढू लागले. त्यामुळे शोषित घटकांचे अधिकाधिक गळचेपी होऊ लागली. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत तंत्रज्ञानात वाढ होऊन बी- बियाण्यामध्ये तसेच खतांमध्ये बदल झाला आणि पारंपरिक शेती करणारा शेतकरी परावलंबी होत गेला. या सर्वच प्रक्रियेमुळे ग्रामीण जीवन आणि संस्कृती उध्वस्त होत गेली. औद्योगिकीकरणाच्या आगमनाने जसे असंख्य प्रश्न निर्माण केले तसेच जागतिकीकरणानंतरही निर्माण झाले. समाजातील शोषित घटक अस्थिर झाला एकूणच मानवी जीवनामध्ये प्रचंड परिवर्तन घडवून आले धर्म, संस्कृती, सामाज, राजकारण अशा सर्वच क्षेत्रामध्ये फार मोठा बदल झाला. याचाच परिणाम मराठी साहित्यावरही झाला असे आपणास म्हणता येईल.

**संदर्भ ग्रंथ**

१. गायकवाड शरद व शिंदे सुनील (संपा.) 'जागतिकीकरण आणि मराठी साहित्य' स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

२. धिंदळे चिंतामण, 'जागतिकीकरण आणि मराठी साहित्य प्रवाह' प्रकाशक डॉ. गणेश ठाकूर, महात्मा फुले कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, पनवेल.

३. कोत्तापल्ले नागनाथ व भगत दत्ता, 'जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य' सायन प्रकाशन, पुणे.

४. वल्ले वासुदेव 'जागतिकीकरणाचा मराठी भाषा व साहित्यावरील प्रभाव' प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.